**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, राजेंद्रनगर, कोल्हापूर - ४१६ ००४**
Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education,
Kolhapur Divisional Board, Rajendranagar, Kolhapur - 416 004

Phones: Chairman 0231-2690829 Secretary 0231- 2691405 FAX : [0231] 2690758
PBX - 0231-2696101, 2696102, 2696103 E-Mail: divsec.kop@gmail.com

क्र.कोविमं/लेखा/टंविफीमाफी/ 7377
कोल्हापूर - 416 004
दिनांक - 16/03/2021

प्रति,
सर्व मान्यता प्राप्त माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये,
जिल्हा सातारा, सांगली, कोल्हापूर

**विषय - सन 2017-18, 2018-19 आणि 2019-20 मधील टंचाईग्रस्त / दुष्काळग्रस्त आणि अवेळी पावसामुळे बाधित क्षेत्रातील विद्यार्थ्यांची परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजनाबाबत ऑनलाईन माहिती देणेसाठी मुदतवाढ.**

संदर्भ - राज्य मंडळाचे पत्र क्र.रा.मं./अंदाजपत्रक/टं.वि.फीमाफी/17-18 व 18-19/1313 दिनांक 15/03/2021

उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, सन 2017-18, 2018-19 मधील इ.10 वी व इ.12 वीच्या परीक्षा शुल्क प्रतिपूर्तीस पात्र असलेल्या आणि अद्याप परीक्षा शुल्क अदा न झालेल्या विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क अदा करणेसाठी तसेच सन 2019-20 मधील अवेळी पावसामुळे 34 जिल्हयातील 349 तालुक्यातील बाधित क्षेत्रातील पात्र विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्क प्रतिपूर्तीसाठी इ.10वी साठी ` **http://feerefund.mh-ssc.ac.in**` आणि इ.12वी साठी ` **http://feerefund.mh-hsc.ac.in**` हया लिंक अपलब्ध करून ऑनलाईनद्वारे दि.15 मार्च, 2021 पर्यंत माहिती मागविलेली आहे. सदर लिंक मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर (mahahsscboard.in) प्रसिध्द करण्यात आली आहे.

सदर नवीन प्रणालीबाबत येणाऱ्या अडचणींचा विचार करून दि.25 मार्च,2021 पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. तरी सर्व माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांनी ऑनलाईनद्वारे माहिती विहित मुदतीत सदर करणेत यावी.

(श्री देविदास कुलाळ)
प्र.विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर.

**प्रत माहितीस्तव तथा पुढील कार्यवाहीसाठी,**

1. मा. सचिव, राज्य मंडळ, कोल्हापूर
2. विभागीय शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर
3. शिक्षणाधिकारी (माध्य.) सातारा, सांगली, कोल्हापूर

यांनी कळविण्यात येते की, तातडीने सर्व मुख्याध्यापक / प्राचार्य यांचेशी संपर्क साधून बाधित क्षेत्रातील पात्र लाभार्थींचे बँक खात्याची माहिती ऑनलाईनद्वारे विहित मुदतीमध्ये राज्य मंडळाकडे जमा करण्यात यावी.